# जिल्हा परिषद जळगाव
## (सामान्य प्रशासन विभाग)

दुरध्वनी क्र.०२५७-२२२४२५५ Email: dyceogenjalgoan@gmail.com

| जा.क्र.साप्रवि/आस्था-९/आरआर/१४/२०२३ | दिनांक :- १६/०५/२०२३. |
|---|---|

**अत्यंत महत्वाचे**

**प्रति,**

**१) सर्व विभाग प्रमुख, जि.प.जळगांव.**
**२) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जळगांव.**
**३) सर्व गट विकास अधिकारी / गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती, जि.जळगांव.**
**४) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी, एका. बाल विकास सेवा योजना, जि.जळगांव.**
**५) सर्व उपअभियंता, जि.प बांधकाम /लघुसिंचन /ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, जि.जळगांव/ यांत्रिकी उपविभाग,जि.प.जळगांव.**
**६) सर्व वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, जि.जळगांव.**
**७) प्राचार्य, जि.प.विद्यानिकेतन व कनिष्ठ महाविद्यालय जळगांव.**
**८) साप्रवि आस्था-७, जि.प.जळगांव.**

**विषय - मर्यादित स्पर्धात्मक विभागीय परिक्षा – २०२२**
जिल्हा परिषदेमधील कनिष्ठ सहाय्यक, भांडारपाल,भांडार सहाय्यक किंवा कॉम्प्युटर या पदांवरील कर्मचा-यांना वरिष्ठ सहाय्यक (लिपीकवर्गीय) पदावर निवडीने भरण्यासाठी परिक्षा.

**संदर्भ** - मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र विआशा/आस्था-४/परीक्षा/जा.क्र.५३५०, दिनांक : ०९/०५/२०२३.त्यासोबत नमुना अ,ब,क

महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील तरतुदीनुसार वरिष्ठ सहाय्यकांची २५ टक्के पदे निवडीने भरण्यासाठी मर्यादीत स्पर्धात्मक विभागीय परीक्षा शासन निर्णय क्र.परीक्षा-१०८९/सीआर-२६४/८९-१३,दि.१८/१२/८९ नुसार, मा. विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचे कार्यालयाकडून घेण्यात येणार असून, या जिल्हा परिषदेकडील ज्या बावीस (२२) रिक्त पदांसाठी सदर परिक्षा घेण्यात येणार आहे, त्यांचा जातीचे प्रवर्गनिहाय तपशील **अनु.जाती ०३, अनु.जमाती - ०३, विजाअ - ०१, भजब – ०१ ,विमाप्र - ०१, इमाव - ०५ , आदुध - ०३ व अराखीव - ०५ व असे एकूण - २२ याप्रमाणे आहे.**

सदर परिक्षेस बसण्यासाठी खालील अटी व शर्ती पूर्ण करणारे कनिष्ठ सहाय्यक, भांडारपाल, भांडारसहाय्क किंवा कॉम्प्युटर ऑपरेटर इत्यादी हे पात्र ठरतात.

१) ज्या कर्मचा-यांच्या सेवा नियमीत नियुक्तीच्या तारखेपासुन म्हणजे प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळ पुरस्कृत उमेदवारांच्याबाबतीत त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून व ज्यांच्या सेवा अन्य कारणास्तव नियमीत झाल्या आहेत त्यांचेबाबतीत सेवा नियमीत केल्यासंबंधीच्या जिल्हा परिषदेच्या आदेशाच्या दिनांकापासून तसेच पदोन्नत कर्मचा-यांचेबाबतीत त्यांच्या नियमीत पदोन्नतीच्या दिनाकांपासून **दि. ०१/०१ /२०२२ रोजी सात वर्ष सेवा पुर्ण झालेली असावी.**

२) अर्जदार मागासवर्गीय प्रवर्गाचा असल्यास त्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची व जात वैधताप्रमाण पत्रांची साक्षांकित केलेली झेरॉक्स प्रत व त्याबाबत त्यांचे मुळ सेवापुस्तकांत तशी नोंद आहे किंवा कसे या बाबतीत माहितीचा दाखला देखील स्वतंत्रपणे दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे.

३) **''कनिष्ठ सहाय्यक (लिपीकवर्गीय)'' याच संवर्गात कार्यरत असलेले कर्मचारी सदर परिक्षेस बसु शकत असल्यामुळे फक्त अशाच कर्मचा-यांचे आवेदन पत्र पाठविणेत यावेत. ''कनिष्ठ सहाय्यक (लेखा)'' या संवर्गात कार्यरत कर्मचा-यांचे आवेदन पत्र पाठविण्यात येवू नयेत.**

४) **सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण असणे अथवा ती उत्तीर्ण होणेपासून सुट मिळालेली असणे आवश्यक आहे. त्यासंबंधी पुराव्याचें कागदपत्र सोबत जोडावे.**

माहीती आपले कार्यालयातील संबंधीत आस्थापना लिपिक यांचे सोबतच संबंधीत कर्मचा-यांचे मुळ सेवापुस्तकासह **दि.१९/०५/२०२३** पर्यंत सामान्य प्रशासन विभाग, जि.प.जळगांव या कार्यालयात **आस्था-९ कार्यासनाकडे DV-TTYogesh फॉन्ट - १६ (हार्डकॉपी व सॉफ्टकॉपी) पेडड्राईव्ह मध्ये न चुकता सादर करावी.** सदर मुदतीत माहिती आपले कार्यालयातील संबंधित आस्थापना लिपिकामार्फत सादर करण्यात न आल्यास व त्यामुळे संबंधीत कर्मचा-यांची परिक्षेस बसण्याची संधी चुकल्यास त्याबाबतीत संबंधित कार्यालय प्रमुखच जबाबदार राहतील याची विशेष नोंद घेण्यात यावी. आपलेकडून सादर करण्यात येणारी माहीती संबंधीत कर्मचा-यांचे मुळ कागदपत्रावरुनच (जसे- मुळ सेवापुस्तक) तपासण्यात येणार असल्याने व त्यानंतरच ती स्विकारली जाणार असल्याने माहिती अपुर्ण राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**आवेदनपत्र व प्रमाणपत्र एकाच कागदावर (पुढे मागे याप्रमाणे) सादर करावे. याप्रमाणे सादर न केल्यास अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

**सदरचे पत्र सर्व संबंधीत कर्मचा-यांचे निदर्शनास आणुन त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेण्यात यावी.** सदर परिक्षेसंदर्भात नंतर कोणतीही तक्रार उपस्थीत झाल्यास त्यास संबंधीत कार्यालय प्रमुख यांनाच जबाबदार धरणेत येईल. सदर परिक्षेसाठीचा अभ्यासक्रम व विषय दर्शविणारे महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग मंत्रालय मुंबई-३२ कडील शासन शुध्दीपत्रक क्र. परिक्षा-१०८९/सीआर-२६४/८९/१३, दि.२७ मार्च १९९१ ची प्रत सोबत माहितीसाठी जोडुन पाठविण्यात येत आहे.

**दिनांक :- १९/०५/२०२३ नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्यांस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.**

जे कर्मचारी सदर परिक्षेस बसण्यास इच्छुक आहेत त्यांचेबाबतीत सादर करावयाची कागदपत्रे (माहिती) खालीलप्रमाणे आहेत.

१) मागासवर्गीय कर्मचा-यांचेबाबतीत जातीच्या दाखल्याची व वैधता प्रमाणपत्रांची साक्षांकीत झेरॉक्स प्रत - २ प्रतीत.
२) आवेदन पत्र - २ प्रतीत. (सोबतचे नमुन्यात)
३) गोपनीय प्रमाणपत्र - २ प्रतीत (सोबतचे नमुन्यात)
४) जोडपत्र - २ प्रतीत. (सोबतच्या नमुन्यात)
५) मुळ सेवापुस्तकात जातीची नोंद व सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण असलेबाबतची नोंद दर्शविणारा दाखला - २ प्रतीत.

**(टिप)**-१) माहिती सादर करतेवेळी संबंधीत कर्मचा-यांचे मुळ सेवापुस्तक तपासणीसाठी सोबत पाठविण्यात यावे. सादर केलेली माहिती तपासून झालेवर सदर मुळ सेवापुस्तक आपले कार्यालयातील संबंधीत लिपिकासोबत परत करण्यात येईल.

**२) सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जि.जळगांव.**

**२/- आपल्या तालुकाअंतर्गत येणा-या सर्व संबंधित कार्यालयांना आपले स्तरावरुन कळविण्यात यावे.याबाबतची जबाबदारी आपले कार्यालयाची राहील.**

**सोबत :- १ ते**

स्नेहा पवार
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)**
**जिल्हा परिषद जळगांव.**

**प्रत - साप्रवि-आस्था-७, नोंदणी शाखा, लघुलेखक जि.प. जळगांव यांना माहितीसाठी व योग्य त्या - कार्यवाहीसाठी.**

**वरिष्ठ सहाय्यक (लिपीकवर्गीय) या पदावर निवडीने नेमणुक होण्यासाठी कनिष्ठ सहाय्यक, भांडार सहाय्यक, भांडारपाल, किंवा कॉम्प्युटर यांच्यासाठी मर्यादीत स्पर्धात्मक विभागीय परिक्षा - २०२२**

---

**आवेदन पत्र**

१) संपुर्ण नांव (आडनांव प्रथम) :-

२) विभाग / कार्यालयाचे नांव. :-

३) विभागीय निवड मंडळाच्या शिफारशी नुसार प्रारंभी ज्या लिपीकवर्गीय पदावर नेमणुक झाली होती त्या पदाचे नांव. :-

४) नेमणुकीचे वर्ष व निकालातील अर्हता क्रमांक :-

५) अखंडीत नियुक्तीची तारीख :-

६) उमेदवार मागासवर्गीय आहेत काय? (महाराष्ट्र शासनाने मान्यता दिल्याप्रमाणे) असल्यास जात, जमात व ज्या राज्याचे अधिवासी आहेत त्याचे नांव.

८) पेपरातील उत्तरे लिहिण्याचे माध्यम ( इंग्रजी किंवा मराठी) :-

**अर्जदाराची सही व दिनांक**

**स्थळ :-**
**दिनांक :-**

**कार्यालय प्रमुखांची सही व हुद्दा**

गोपनीय

**आस्थापना अधिका-यांनी किंवा कार्यालय प्रमुखांनी द्यावयाचे प्रमाणपत्र.**

श्री / श्रीमती ---------------------------------------------------------------यांचे बाबतीत प्रमाणीत करण्यात येते की, अर्जामध्ये दिलेली निवड मंडळाच्या शिफारशीनुसार केलेल्या नेमणुकीसंबंधीची माहिती कार्यालयातील नोंदवरून तपासण्यात आली आणि जात व राज्याच्या निवासासंबंधीची माहिती मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई वा जिल्हा दंडाधिकारी किंवा महानगर दंडाधिकारी वा जिल्हा दंडाधिकारी यांनी वृत्तीधारी, दंडाधिकारी यांना वयासंबंधीची प्रमाणपत्रे देण्याचा अधिकार दिला असेल अशा दंडाधिकारी यांनी दिलेल्या वय, राष्ट्रीयत्व व अधिवास याबाबतच्या मुळ प्रमाणपत्रांवरून तपासण्यात आली.

उमेदवाराचा गोपनीय अभिलेख समाधानकारक आहे आणि तो / ती वरिष्ठ सहाय्यक (लिपीकवर्गीय) या पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्र आहे.

**कार्यालय प्रमुखांची सही**
**व हुद्दा**

**स्थळ :-**
**दिनांक :-**

---

**विभागीय आयुक्तांच्या कार्यालयाने नोंद घेण्यासाठी खालील जागा राखुन ठेवली आहे.**

**पात्र / अपात्र**

**स्विकारावा / फेटाळावा.**

## जोडपत्र

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कर्मचा-यांचे नांव, पदनाम व हल्लीचे कार्यालय | :- | |
| २) | हल्लीचे पदावरील नेमणुकीची तारीख व हजर झाल्याचा दिनांक | :- | |
| ३) | दिनांक १.१.२०२२ रोजी कनिष्ठ सहाय्यक (लिपीकवर्गीय) पदावरील एकुण सेवा | :- | |
| ४) | सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण वर्ष व गुणानुक्रमांक अथवा परिक्षा उत्तीर्ण होणेपासून सुट मिळाली असल्यास तपशील | :- | |
| ५) | उमेदवारांची शैक्षणिक पात्रता | :- | |
| ६) | जन्मतारीख | :- | |
| ७) | वय | :- | |
| ८) | जात | :- | |
| ९) | जातीचा प्रवर्ग आणि जातीच्या दाखल्याचा क्रमांक व दिनांक | :- | |
| १०) | निवास पत्ता | :- | |
| ११) | विहीत नमुन्यात उमेदवाराने अर्ज भरल्याचा दिनांक | :- | |
| १२) | शिक्षण, वय, जात, निवास इ. बाबतच्या नोंदी मुळ कागदपत्रांशी सुसंगत आहेत किंवा कसे याबाबत स्पष्ट अभिप्राय. | :- | |
| १३) | दि.१.१.२०२२ च्या अंतिम जेष्ठता सुचीतील अनुक्रमांक व विकल्प | :- | अनुक्रमांक |
| १४) | दि.१.१.२०२२ च्या अंतीम जेष्ठता सुचीत नमुद केलेला जातीचा प्रवर्ग (उदा. अनु.जाती/अनु.जमाती/विमाप्र इ.) | :- | |
| १५) | सदर कर्मचा-यांविरूध्द हल्लीचे अथवा यापुर्वीचे अथवा अन्य कार्यालयामार्फत विभागीय चौकशी अथवा न्यायालयीन प्रकरण सुरू अथवा प्रस्तावीत आहे काय, असल्यास थोडक्यात तपशील. | :- | |

**दिनांक :-** **कार्यालय प्रमुखांची सही व हुद्दा**

**दाखला क्र.१**

दाखला देण्यात येतो की श्री / श्रीमती ---------------------------------------------- हुद्दा ------------------- यांचे विरूध्द त्यांचे गैरवर्तणुकी तथा गैरशिस्ती प्रकरणी कोणत्याही प्रकारचे विभागीय चौकशी अथवा न्यायालयीन प्रकरण सुरू अथवा प्रस्तावित नाही हा दाखला दिला असे.

(चौकशी सुरू अथवा प्रस्तावित असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा.)

स्थळ-

दिनांक : / /२०२२.

**कार्यालय प्रमुखाची सही व शिक्का**

---------------oooooooooo---------------

**दाखला क्र.२**

मी श्री / श्रीमती -------------------------------------------- हुद्दा ------------------कार्यालय --------------------------- याव्दारे लिहून देतो की माझ्या विरूध्द यापुर्वी किंवा हल्ली काम करीत असलेल्या कार्यालयामार्फत तसेच अन्य कार्यालयामार्फत गैरवर्तणुकी तथा गैरशिस्ती प्रकरणी विभागीय चौकशी अथवा न्यायालयीन प्रकरण सुरू अथवा प्रस्तावित नाही.हा दाखला दिला असे.

(चौकशी सुरू अथवा प्रस्तावित असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा.व कोणत्या कार्यालयामार्फत सुरु आहे ते नमुद करावे)

स्थळ –

दि. / /२०२२.

**कर्मचाऱ्याची सही व हुद्दा**

**समक्ष**

**कार्यालय प्रमुखाची सही व शिक्का**

मर्यादित स्पर्धात्मक विभागीय परिक्षा जिल्हा परिषदेतील
कनिष्ठ सहाय्यक, भांडार सहाय्यक, भांडारपाल किंवा
कॉम्प्युटर या पदांवरील कर्मचा-यांना वरिष्ठ
सहाय्यकांच्या पदावर निवडीने भरण्यासाठी.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्र. परिक्षा/१०९८/सीआर/२६४/८९/१३**
**मंत्रालय मुंबई -३२, दि.२७ मार्च १९९१.**

**पहा :-** शासन निर्णय क्र. परिक्षा-१०८९/सीआर/२६४२६४/८९/१३, दि. १८/१२/८९.

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदेतील कनिष्ठ सहाय्यक, भांडार सहाय्यक, भांडारपाल किंवा कॉम्प्युटर या पदावरील कर्मचा-यांना वरिष्ठ सहाय्यकांच्या पदावर निवडीने भरण्यासाठी स्पर्धात्मक परिक्षा लागू करण्यात आली होती. त्या परिक्षेचा अभ्यासक्रम संदर्भाधीन शासन निर्णयात परिच्छेद २ मध्ये विहीत करण्यात आला होता. सदर अभ्यासक्रमात सुधारणा करण्यात आली असून परिच्छेद २ मध्ये विहीत केलेल्या अभ्यासक्रमाऐवजी खालील अभ्यासक्रम स्पर्धात्मक परिक्षेसाठी विहीत करण्यात येत आहे.

**<u>अभ्यासक्रम</u>**

| | गुण |
|---|---|
| **प्रश्नपत्रिका क्रमांक - १** | ३० |
| १) जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत कामकाज विषयक बौध्दीक स्वरूपाचे प्रश्न. | ७० |
| २) टिपण्या व पत्रव्यवहार यांचा समावेश असलेली कार्यालयीन पत्र | |
| **प्रश्नपत्रिका क्रमांक - २** | ३० |
| १) कार्यालयीन कामकाज | ७० |
| २) खालील नियमावरील प्रश्न | |

एक) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८
दोन) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती, अधिनियम १९६१
तीन) महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) व (शिस्त व अपील) नियम १९६४ (एकत्रीत)
चार) महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१
पांच) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१
सहा) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२
सात) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१.
आठ) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील
चॅप्टर क्र. ३ (Pay and allowance)
चॅप्टर क्र. ४ (Contigency of other charges including stores)
नऊ) जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९६६

दोन्ही प्रश्नपत्रिका ह्या पुस्तकांशिवाय व प्रश्न वस्तुनिष्ठ (Objective type) असावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**सही/- X X X**
**(भि.बि.जोशी)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन.**

नमुना -क्र

जिल्हा परिषदेतील कनिष्ठ सहाय्यक, भांडार सहाय्यककिंवा कम्प्युटर या पदांवरील कर्मचा-यांना वरिष्ठ सहाय्यक पदांवर निवडीने भरण्यासाठी घेण्यात येणा-या मर्यादित स्पर्धात्मक परिक्षा २०२२ साठी योग्य कर्मचा-याची माहिती.

| .अ.क्र. | कर्मचारीयांचे नावं | पदनाम | .अखंड सेवेची तारीख | | | सध्या काम करित असलेले कार्यालय | जातीचा प्रवर्ग | जात वैधता प्रमाण पत्रांची तारीख | जन्म दिनांक | | | परिक्षेचे माध्यम | सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण दिनांक | कनिष्ठ सहा.पदा कधीपासुन काम करित ओहेत तो दिनांक | | | दि.०१/०१/२०२२ रोजी कनिष्ठ सहाय्यक पदावरील एकुण सेवा | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | दिनांक | महिना | वर्ष | | | | दिनांक | महिना | वर्ष | | | दिनांक | महिना | वर्ष | दिनांक | महिना | वर्ष | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

प्रमाणित करण्यात येते ड्डि ,वरील उमेदवार हे परीक्षेस बसण्यासाठी योग्य उमेदवार आहेत. तसेच पदोन्नतीस पात्र नाही अशा उमेदवारांचा वरील माहितीमध्ये समावेश नाही यांची खात्री करण्यात आलेली आहे

कार्यालय प्रमुखांची सही व हुद्दा